परिचर गट-ड या संवर्गातील कर्मचा-यांना कनिष्ठ सहाय्यक (लेखा) गट-क या पदावर पदोन्नती देणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
अर्थ विभाग
जिल्हा परिषद आदेश जा.क्र.अर्थ/कार्या-१/आस्था-१/७३५/२०२५
अहिल्यानगर दिनांक ०१/०४/२०२५

वाचा- १.महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७ मधील परिशिष्ठ ११(४) (महाराष्ट्र शासन राजपत्र,ग्रामविकास व जलसंधारण विभाग दिनांक ३ मे,२००६)
२.सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.एसआरव्ही२०१८/प्र.क्र.१५९/का-१२ दिनांक ०१/०८/२०१९
३. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.बीबीसी२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब दिनांक ०७/०५/२०२१
४. पदोन्नती समिती इतिवृत्त दिनांक २४/०३/२०२५
५.सामान्य प्रशासन विभागाकडील पत्र जा.क्र.साप्रवि१/आस्था-४/१२०/२०२५ दिनांक २८/०३/२०२५ व सहपत्र पदोन्नती समिती इतिवृत्त दिनांक २४/०३/२०२५

जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत परिचर गट-ड या पदावर कार्यरत असलेल्या कर्मचारी यांना कनिष्ठ सहाय्यक (लेखा) गट-क या पदावर वेतनश्रेणी एस-०६ रुपये १९९००-६३२०० मध्ये निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खालील अटींच्या अधिन राहुन खालील रकाना क्रमांक ५ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी पदस्थापना देण्यात येत आहे.

पदोन्नतीने दिलेली पदस्थापना ही संदर्भ क्रमांक ३ मध्ये दिलेल्या सूचनेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ वरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार बिंदूविरहीत भरण्यात येत आहे.

| अ.क्र | कर्मचा-याचे नांव | सध्याचे कार्यालय | स्वतःचा प्रवर्ग | निवडीचा प्रवर्ग | पदोन्नतीने पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ४ | ५ |
| १ | श्री.सोपान हरिभाऊ जाधव | प.वै.द.तिसगाव ता.पाथर्डी | भ.ज.क . | ज्येष्ठतेनुसार बिंदूविरहीत | पं स सेवगाव |

**अटि व शर्ती-**

१. सदरची पदोन्नती ही मा.सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाने दाखल केलेली विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहुन निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात देणेत येत आहे.
२. शासन निर्णय दिनांक १/४/२०१०,दिनांक २/३/२०१९ व शासन परिपत्रक दिनांक २८/७/२०१४ मधील तरतुदींनुसार सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत पहिला/दुसरा/तिसरा लाभ मंजूर केलेल्या कर्मचा-यांनी सदर पदोन्नती नाकारल्यास त्यांना देण्यात आलेला लाभ काढून घेण्यात येईल.
३. सदर पदोन्नती ही तात्पुरत्या स्वरुपाची असल्यामुळे पदोन्नतीच्या दिनांकापासून सेवाज्येष्ठतेचा हक्क सांगता येणार नाही.
४. नेमणूकीचे ठिकाणी विहित कालावधीत हजर न झाल्यास तसेच नेमणूकीचे पदस्थापनेत बदल करणेसाठी कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ मधील नियम ४ नुसार कारवाई करणेत येईल.
५.संबधिताने प्रस्तुत पदावर हजर झालेनंतर जिल्हा परिषद सेवा प्रवेशोत्तर परिक्षा हि चार वर्षामध्ये तीन संधीत उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.
६. संबधीत कार्यालय प्रमुखांनी वरिल कर्मचा-यांस पदोन्नतीने नियुक्तीचे ठिकाणी हजर होणेसाठी पर्यायी स्थानिक व्यवस्था करुन तात्काळ कार्यमुक्त करावे.कार्यालयाची निकड विचारात घेऊन पदोन्नती देण्यात आलेली असल्याने

..२

संबधीताने ०७ दिवसाचे आंत पदोन्नतीच्या ठिकाणी हजर व्हावे अन्यथा सेवा ज्येष्ठता डावलली जाईल. तसेच सदरची पदोन्नती स्विकारत/नाकारत असलेबाबतचे लेखी पत्र संबधिताने त्यांचे कार्यालय प्रमुखामार्फत सात दिवसांत अर्थ विभाग,जि.प.अहमदनगर येथे सादर करावे.

७. सदरचे आदेशाची नोंद संबधिताचे मुळ सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

सदर आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२५०४०७०५००१७ असा आहे.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी
जिल्हा परिषद, अहिल्यानगर

(आशिष येरेकर भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१) श्री.सोपान हरिभाऊ जाधव,परिचर, प.वै.द.तिसगाव ता.पाथर्डी
द्वारा पशूधन विकास अधिकारी, प.वै.द.तिसगाव ता.पाथर्डी, जिल्हा अहिल्यानगर

२) पशूवैद्यकीय अधिकारी, प्रा.आ.केंद्र देवगाव ता.नगर, जिल्हा अहिल्यानगर

प्रत- १. मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर
२. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य),जिल्हा परिषद अहिल्यानगर
३. जिल्हा पशूसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर
४.गटविकास अधिकारी,पंचायत समिती शेवगाव/पाथर्डी
५.निवड नस्ती

मुख्य लेखा व वित्त अधिकारी
जिल्हा परिषद, अहिल्यानगर

(आशिष येरेकर भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर